# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

**दिनांक ०४.०९.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक ०३.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये ११ केसेसमध्ये १२ ईसमावर कारवाई करून एकुण १६,८१,३५०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०८ केसेसमध्ये ११ इसमांवर कारवाई करून एकुण ३०,६००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,६३२ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. ११,९७,०५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) नवीन कामठी पोलीसांची कामगीरी :— घरफोडी व वाहनचोरीचा गुन्हा करणारे आरोपींना अटक.**

दिनांक १८.०८.२०२६ चे १८.०० वा. ते १९.०८.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीत, कुंभारे कॉलनी, ऑटो चौकजवळ, कामठी येथे राहणारे फिर्यादी आकाश अशोक जगजीत वय ३४ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह तिरोड, गोंदिया येथे त्यांचे आत्याचे घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडून, आत प्रवेश करुन, बेडरुममधील लोखंडी आलमारीतील रोख ३३,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ३,४७,६५५/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नवीन कामठी येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान नवीन कामठी पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, दोन आरोपींना निष्पन्न केले. आरोपी हे बिलासपुर, छत्तीसगड येथे असल्याने, नवीन कामठी पोलीसांनी तेथे जाऊन आरोपी क्र. १) आशिष मनोहर मेश्राम वय ३२ वर्षे रा. कुंभारे कॉलनी, कामठी, ह.मु. बिलासपुर, छत्तीसगढ यास ताब्यात घेऊन गुन्हयासंबंधाने विचारपुस केली असता, त्याने वर नमुद घरफोडीचा गुन्हा त्याचा साथीदार आरोपी क्र. २) बादल रवि नगरारे वय २८ वर्ष रा. कुंभारे कॉलनी, कामठी, नागपूर याचेसह संगनमताने केल्याची कबुली दिली. आरोपी क्र. १ चे ताब्यातुन गुन्हयातील चोरी गेलेले सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने कि. एकुण ५७,७५६/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीस अधिक सखोल विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे तिरोडा जि.

गोंदिया हद्यीत एक वाहनचोरीचा गुन्हा केल्याचे सांगितले. आरोपीकडून घरफोडी व वाहनचोरीचे एकुण दोन गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री रमेश धुमाळ, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ६), मा. श्री. अंकुश खेडकर, सहा. पोलीस आयुक्त (कामठी विभाग), वपोनि. श्री महेश आंधळे यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि. योगेश नालटे, अक्षय झगडे, सफौ. किशोर महंत, पोअं. विवेक गोरसेटवार, सुरज ठाकूर, आशिष बागडे व तुषार मोरे यांनी केली.



**<u>३) यशोधरानगर पोलीसांची कामगीरी :— घरफोडी व वाहनचोरीचे गुन्हे करणाऱ्या कुख्यात गुन्हेगारास अटक. एकूण ०८ गुन्हे उघडकीस.</u>**

दिनांक ०३.०९.२०२६ रोजी, यशोधरानगर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्यीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना गुप्त बातमीदारामार्फतीने माहिती मिळाली की, अभिलेखावरील गुन्हेगार नामे पियुष उर्फ गधा रा. पाचपावली याने काही ठिकाणी वाहनचोरी व घरफोडी केलेली आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन, आरोपीचा पंचवटीनगर मैदान परिसरात शोध घेतला असता, वेळ १५.३५ वा. चे सुमारास तेथे मिळालेल्या वर्णनाचा इसम पोलीसांना पाहून पळून जाण्याचे बेतात असता, त्यास घेराव टाकुन, ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव पियुष उर्फ गधा दीपक निमजे वय २० वर्षे रा. नाईक तलाव, बांग्लादेश, माहुरकर मुर्तीकारचे घराजवळ, पाचपावली नागपूर असे सांगितले. त्यास घरफोडी व वाहनचोरीबाबत सखोल विचारपुस केली असता, त्याने पोलीस ठाणे यशोधरानगर हद्यीत कुंदनलाल गुप्ता नगर परिसरात ०१ घरफोडी व ०१ वाहनचोरी, कांजी हाऊस परिसरात ०१ घरफोडी, धम्मदीप नगर परिसरात ०१ पानठेलाफोडी व ०१ वाहनचोरी, तसेच पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्यीत नेहरुनगर येथे ०१ वाहनचोरी, पोलीस ठाणे पारडी हद्यीत ०१ वाहनचोरी व शांतीनगर हद्यीत ०१ वाहनचोरी असे तीन घरफोडी व पाच वाहनचोरीचे एकूण ०८ गुन्हे केल्याची कबुली दिली. पोलीस ठाणे शांतीनगर हद्यीत केलेली वाहनचोरी त्याचे इतर साथीदार आरोपी विक्की डेहरीया व विनोद उर्फ गद्यु लांजेवार यांचेसोबत संगनमताने केल्याचे सांगुन, त्यामध्ये आरोपी पियुष उर्फ गधा हा पाहिजे आरोपी होता. आरोपीचे ताब्यातुन सर्व गुन्ह्यातील रोख १०,०००/—रू, चांदीचे वेगवेगळे दागिने, पानठेल्यामधील विक्रीचे साहित्य, बजाज पल्सर क्र. एमएच ४९ सीबी ६१६७, हिरो एक्स्ट्रीम गाडी क्र. एमएच ४० डीडी ८३९३, होंडा ॲक्टिवा मोपेड क्र. एमएच ४९ बीएस ३७५५, होंडा स्प्लेंडर एमएच ४९ एम ९५७१ व रॉयल एनफिल्ड बुलेट क्र. एमएच ४० डीझेड ३७७८ असा एकूण ३,४७,२८८/— रु चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी, सह पोलीस आयुक्त, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रभाग, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमणा विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली,

वपोनि. श्री. युनुस चांद शेख, पोउपनि. निलकंठ नन्नावरे, पोहवा. गणेश गुप्ता, रवि अहीर, पोअं. अमोल भेंडेकर लक्ष्मन पडवाल, रितेश दुधे, अक्षय कुळसंगे व मंगेश गिरी यांनी केली.



**<u>४) सिताबर्डी पोलीसांची कामगीरी :— अवैध दारूसाठा जप्त.</u>**

दिनांक ०३.०९.२०२६ चे १३.५० ते १४.५० वा. चे दरम्यान, सिताबर्डी पोलीसांचे पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाण हद्दीत गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहीती मिळाली की, एक पांढरे रंगाची क्रेटा कार क्र. एमएच ४९ बीके ३०८३ यामधुन अवैध दारुसाठ्याची वाहतुक केली जात आहे. अशा माहितीवरून, परिसरात कारचा शोध घेत असता, रामदासपेठ, नंदाजी मंदीरजवळील मोकळया जागेत मिळालेल्या वर्णनाची क्रेटा कार मिळून आली. कारजवळ जाऊन पाहणी केली असता, त्यामध्ये कोणीही इसम दिसुन आला नाही. परंतु कारमध्ये रॉकेट देशी दारू संत्रा नावाच्या एकुण ४५ पेट्या मिळून आल्या. पंचासमक्ष पेटीची पाहणी केली असता, प्रत्येक पेटीमध्ये ९० मि.ली. च्या १०० नग बॉटल, याप्रमाणे एकुण ४५०० बॉटल्स कि. १,८०,०००/—रू. चा मुद्येमाल मिळून आला. घटनास्थळावरुन अवैध दारुसाठा व क्रेटा कार असा एकुण कि. १४,८०,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वाहनाचे मालकाबाबत शोध घेतला असता, वाहन मालक नामे शानु कन्हैयालाल कोडापे, वय ३७ वर्षे, रा. रामदासपेठ, नंदाजी मंदीरजवळ, नागपूर असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे नावे असलेल्या कारमध्ये अवैद्यरित्या दारूचा साठा मिळुन आल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे सिताबर्डी येथे कलम ६५(ई) महा. दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंदविला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्री. सुनिलसिंग पवार, सहा. पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. श्री. सुहास राऊत, सपोनि. विनोद मांढरे, पोहवा. आशिष बहाळ, नापोअं. देवेंद्र सुर्यवंशी, पोअं. राजेश घोगडे, मपोअं. अनिता वरकडे व चालक सफौ. अनिल चौधरी यांनी केली.



(गुन्हे)

**१) पोलीस ठाणे मानकापूर :— अकस्मात मृत्युचे चौकशीवरून जिवे ठार मारण्याचा गुन्हा दाखल. जिवे ठार मारणारा आरोपी अटकेत.**

दिनांक ०३.०९.२०२६ चे ०१.३० वा. चे सुमारास, फिर्यादीची लहान बहिण नामे सौ. यामिनी कृष्णलाल यादव वय ३८ वर्षे, रा. फ्लॅट क्र. १०५, गोविंद सिटी टॉवर—३, झिंगाबाई टाकळी, गोधनी रोड, नागपुर यांचा अचानक मृत्यु झाल्याने पोलीस ठाणे मानकापुर येथे अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली होती.

अकस्मात मृत्युचे चौकशीदरम्यान, मृतकाचा प्राथमिक शवविच्छेदन अहवाल प्राप्त झाल्याने, त्यामध्ये मृतक महिलेचा 'गळा दाबल्याचे' कारणाने तिचा मृत्यु झाल्याचा अभिप्राय प्राप्त झाला. तसेच, मृतकाचे अंगावर जखमा आढळून आल्या. तिचा पती आरोपी नामे कृष्णलाल शिवराम यादव, वय ४१ वर्षे याने मारहाण करुन तिचा गळा दाबुन तिला जिवानिशी ठार केले, अशा मृतक महिलेचे मोठा भाऊ फिर्यादी राजेंद्र रामयश यादव, वय ४९ वर्षे, रा. जयभारत नगर, पोंडपाडा, कलवा पुर्व, ठाणे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोहवा. परसराम मानकर यांनी पोलीस ठाणे मानकापूर येथे आरोपीविरुध्द कलम १०३(१) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद केला असून, आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे वाडी :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक ०३.०९.२०२६ चे २३.५० वा. चे सुमारास, वाडी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहीती मिळाली की, रमाबाई चौक, आंबेडकर नगर येथे एक हद्दपार इसम फिरत आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, नमुद ठिकाणी गेले असता, तेथे हद्दपार ईसम दिसुन आला. तो पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव प्रज्वल उर्फ धम्मा अनिल बागडे वय २६ वर्षे, रा. रमाबाई चौक, आंबेडकर नगर, वाडी, नागपूर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०१/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने परीसरात समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे वाडी येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे सक्करदरा:— चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी सौ. अश्विनी रोशन राऊत वय ३३ वर्षे, रा. चिटणीस नगर, प्लॉट क्र. ६५६, संजय पोटदुखे यांचे घरी किरायाने, नंदनवन, नागपूर ह्या त्यांचे माहेर आरमोरी जि. गडचिरोली येथून दिनांक ०१.०९.२०२६ चे १६.१० वा. चे सुमारास आपले लहान मुलासह श्री साई ट्रव्हल्स बस क्र. एमएच ४० बीझेड ६२७३ ने नागपुर करीता निघाल्या होत्या. त्यांचेसोबत असलेलल्या एका छोट्या हॅल्डबॅगमध्ये सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने व रोख ३५,०००/—रू. असा एकुण २,०९,७५०/—रू. चा मुद्येमाल होता. फिर्यादी यांनी दिघोरी, नागपूर येथे आल्यावर त्यांचे पतीला फोन केला असता, त्यांना मुद्येमाल असलेली बॅग दिसली होती. दिनांक ०१.०९.२०२६ चे १९.२० वा. चे सुमारास पंचवटी बस स्टॉप येथे ट्रॅव्हल्स बसमधुन उतरल्या असता, तेथे त्यांचे बॅगची चैन उघडी दिसून आली व त्यामधील मुद्येमाल असलेली छोटी बॅग दिसली नाही. कोणीतरी अज्ञात चोरट्याने गर्दीचा फायदा घेवुन, फिर्यादीची नजर चुकवुन, त्यांचे जवळील बॅगची चैन उघडुन, त्यामधील २,०९,७५०/—रू. चा मुद्देमाल असलेली छोटी बॅग चोरून नेली.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे पोउपनि. कुणाल दिघावकर ८००७८५९५२६ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(क) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, कोर्ट क्र. ४, नागपुर. | ३०१७६३/ २००८ | कलम ३८० भा.दं.वि. | शेख इकबाल शेख वहाबुद्दीन रा. बंगाली पंजा, मोठी मस्जिद जवळ, सलाम यांचे घरी किरायाने, तहसील नागपुर | ०१.१०.२०२६ |
| २. | मा. जिल्हा न्यायाधिश —१७ तथा अति. सत्र न्यायाधीश, नागपुर. | ४६५ /२०२३ | कलम १४३, १४४,३०७, ३४१ भा.दं.वि. | समिर शेख अकरम शेख, रा. प्लॉट क्र. १९७, गुलशन नगर, जामा मस्जिदजवळ, कळमणा नागपुर | १९.०९.२०२६ |

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**